पृ ३० ८

केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्रानुसार केंद्र शासनाच्या कार्यालयामधून/प्राधिकरणामधून मराठीचा वापर करणेबाबत.

भाषा संचालकाकडे मराठी भाषेच्या धोरणाची अंमलबजावणी सोपविण्याबाबत —

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक — मभावा –१०९१/१२८/२०–ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ६ सप्टेंबर, १९९१.

पहा :- १) शासन निर्णय, क्रमांक–मभावा–१०८७/१०४७/प्र.१७२/८७/२०–ब,
दिनांक २९ जुलै, १९८९.
२) शासन परिपत्रक क्रमांक –मभावा–१०९१/१२८/२०–ब,
दिनांक १७ मे, १९९१.

परिपत्रक :-

शासन व्यवहारात मराठीचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या धोरणानुसार व केंद्र शासनाच्या त्रिभाषासूत्रानुसार केंद्र शासनाच्या कार्यालयामधून/प्राधिकरणामधून जनतेच्या माहितीसाठी लावले जाणारे नामफलक, सूचना फलक यांवर हिंदी व इंग्रजी भाषेसह मराठी भाषेचाही वापर केला जातो किंवा नाही हे पहाण्याचे व वापर केला जात नसल्यास, सदर कार्यालयाकडे त्याबाबतीत पाठपुरावा करण्याचे काम संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे शासन परिपत्रक क्रमांक–मभावा–१०९१/१२८/२०–ब, दिनांक १७ मे, १९९१ अन्वये सोपविण्यात आले आहे. शासनाच्या मराठीकरणाच्या धोरणानुसार, शासन निर्णय, क्रमांक–मभावा–१०८७/१०४७/प्र. १७२/८७–२०–ब, दिनांक २९ जुलै, १९८९ अनुसार महाराष्ट्रातील विभागीय व जिल्हास्तरावरील राज्य शासकीय कार्यालयातील कामकाजात राजभाषा मराठीचा वापर काटेकोरपणे केला जातो किंवा नाही याची पाहाणी करण्याचे काम भाषा संचालनालयाकडे सोपविण्यात आले असून त्यानुसार विभागीय व जिल्हास्तरावरील कार्यालयांची तपासणी त्या संचालनालयाकडून वेळोवेळी करण्यात येते. संबंधित जिल्हाधिका-यांच्या कार्यालयांची तपासणी करतेवेळी शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मभावा–१०९१/१२८/२०–ब, दिनांक १७ मे, १९९१ मधील आदेशानुसार जिल्हाधिकारी आवश्यक ती कार्यवाही करतात किंवा कसे हे तपासण्याचे काम भाषा संचालनालयाकडे

पृ. मा. पा.

सोपविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उचित कार्यवाही करावी व तपासणी अहवालात त्यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांनी पाठपुरावा करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

[अ. व. आम्बेरकर ]
शासनाचे उपसचिव.

प्रत -

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
निवड नस्ती.